'Research Journey' International Multidisciplinary E- Research Journal
Vol. 2 Issue. 2
ISSN :2348-7143 (Online)
April- June- 2015

# जागतिक मंदी असणि भारत

**प्रा. डॉ. के. पी. सरोदे**
अर्थशास्त्र विभाग,
श्री. व्ही. एस. नाईक कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,
रावेर जि. जळगाव (महाराष्ट्र)

*विकसनशील भारतात कृषी, उद्योग व व्यवसाय ही तिनही क्षेत्र प्रगतीपथावर आहेत. त्यातील महत्वपूर्ण क्षेत्र म्हणजे उद्योग होय. औद्योगिकीकरण हे विकासाचे प्रमुख द्योतक मानले जाते. परंतु भारताच्या औद्योगिकीकरणामध्ये अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात जाणवते. अमेरिकेतील मंदीमुळे बहुराष्ट्रीय कंपन्याच्या आर्थिक प्राबल्यासोबतच भारतीय संस्कृतीवर देखील त्याचा विपरीत परिणाम होतो. भडक जाहिराती करुन मानसिक विकृती करणे. विशिष्ट बाजारपेठ प्रस्थापित करणे (सुपर मार्केट मॉल्स) भारतासारख्या विकसनशील देशातील सामान्य ग्राहकांना हे परवडणारे नाहीत. अशा कंपन्याचा नैतिकतेशी देखील संबंध नसतो. अशा कंपन्यामुळे विकासाला काही प्रमाणात हातभार लागत असला तरी सामान्य व्यक्तीच्या हाताला काम मिळत नाही त्याच्या हातावरील आर्थिक भार वाढतो आहे.*

एकविसावं शतक सुरू झाल्यावर इंडिया शायनिंगमुळे आर्थिक विकासाचा दर ८.५ % वर पोहचला होता. परंतु सात वर्षातच आर्थिक मंदिने होत्याच नव्हतं करायला सुरूवात केली. सेन्सेक्सची घसरण सुरू झाली. देशभरात साधारण एक कोटी नोकऱ्यांवर गडांतर, चकाचक मॉल कालवंडले पर्यटनावर विपरित परिणाम, रिअल इस्टेटला मोठी खोट, मोठया उद्योगांवर विपरित परिणाम, लघु उद्योगांना टाळेबंदी, शासकीय प्रकल्प रखडले. निर्यातीत घट, शासनाच्या महसुलामध्ये घट एकीकडे उद्योगधंदे बंद होताहेत. दुसरीकडे जॉब मार्केट अस्थिर झाले आहे.

१९२९-३० च्या जागतिक आर्थिक मंदीने अर्थशास्त्राचे स्वरूप बदलवून टाकले. ह्या मंदीच्या तडाख्यात विविध देशांच्या अर्थव्यवस्था होरपडून निघाल्या त्यानंतर आज २१ व्या शतकात निर्माण झालेल्या जागतिक आर्थिक मंदीच्या विळख्यात जगातील विविध देशांच्या अर्थव्यवस्था सापडलेल्या आहेत. आजच्या मंदीचा जन्म जरी अमेरीकेत झालेला असला तरी जागतिकीकरणाचा परिणाम म्हणून जगातील सर्वच देशांवर मंदीची छाया पसरलेली आहे. भारतीय अर्थव्यवस्था सुध्दा यास अपवाद नाही. मंदीच्या सुरूवातीस भारतातील अर्थतज्ञ, राजकीय नेते मंदीचा भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत परिणाम होणार नाही असा दिलासा देत होते. पण काही दिवसातच हळूहळू भारतीय अर्थव्यवस्थेतील विविध क्षेत्रांवर मंदीचे दुष्परिणाम दिसून येऊ लागले.

२१ व्या शतकाच्या सुरूवातीस भारताचा आर्थिक विकास दर ८.५ टक्के एवढा होता. पण मंदीचा परिणाम म्हणून ह्या दरात ६ ते ७ टक्क्यांपर्यंत घसरण झाली. मंदीचा सर्वात मोठया प्रमाणात रोजगारावर विपरित परिणाम झाला. जवळ जवळ ५ कोटी पेक्षा जास्त लोक बेकार झाले. लाखो सॉफ्टवेअर इंजीनिअर्स, तंत्रज्ञ, कुशल अकुशल कामगार यांना आपल्या नोकऱ्या गमवाव्या लागल्या.

आर्थिक मंदीमुळे भारतीय अर्थव्यवस्थेतील निर्यात क्षेत्र झाले. मंदीचा परिणाम निर्यातीत ४ ते ५ टक्के घट झाली. विशेषत: ज्वेलरी, तयार कपडे, हिऱ्यांचे दागिने या क्षेत्रातील निर्यातींवर प्रतिकूल परिणाम झाला. पर्यटन उद्योग सुध्दा प्रभावित झाला. परकीय प्रवाशांच्या संख्येत घट झाल्यामुळे परकीय चलनाची गंगाजळी कमी झाली. बांधकाम क्षेत्रालाही मंदीचा फार मोठा आर्थिक फटका बसला. बिल्डर्स, कॉन्ट्रक्टर्स यांची या क्षेत्रातील कोटयावधी रूपयांची

गुंतवणूक घरांची, फ्लटची मागणी घटल्यामुळे धोक्यात आली आहे. सिमेंट, स्टील आणि इतर बांधकाम साहित्याच्या मागणीवरही विपरीत परिणाम झाला.

स्वयंचलित वाहन उद्योग मंदीमुळे प्रभावित झालेला दिसून येतो. मोटारी, मोटारसायकल्स यांच्या मागणीतील कमतरतेमुळे या उद्योगातील कामगारांवर बेकारीची कुऱ्हाळ कोसळली. मंदीचा फटका मोठया उद्योगांबरोबर लहान उद्योगांनाही बसला कारण हे उद्योग मोठया उद्योगांवर अवलंबून होते. मध्यंतरी भारतात माहिती तंत्रज्ञानाची (आय. टी.) लाट निर्माण झाली होती. या क्षेत्रात मोठया प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण झाल्या होत्या. पण मंदीचा फटका म्हणून या क्षेत्रातील उच्चशिक्षित तंत्रज्ञ कर्मचारी बेकार झाले. नवीन रोजगाराच्या संधी ठप्प झाल्या. काही आय. टी. कंपन्यांनी कामगारांच्या वेतनात ४० ते ५० टक्क्यांपर्यंत कपात केली.

जागतिक मंदीमुळे दारिद्रालाही नव्या दिशा प्राप्त होत आहेत. त्यामधून काही दारिद्राच्या सीमेवर जाऊन पोहचत आहेत. ज्यांच्यापाशी जमीन, भांडवल, नोकरी, सामाजिक सुरक्षितता यांच्यापैकी काहीही नसेल ते बाजारपेठेच्या बाहेर फेकले जातात. जागतिक स्पर्धाच्या काळात केवळ व्यक्तीवर भर असल्याने लोकांना एकत्र टिकवून धरणाऱ्या परंपरा आणि सामाजिक बांधिलकीची भावना याचा लोभ होत आहे. कारण जंगले, जमीन, खनिजे ही पूर्वीपासून देशाची संपत्ती मानली जाई. पण त्यांचा तत्परतेने व वेगाने वापर व्हावा या दृष्टीने अंतरराष्ट्रीय स्पर्धेमधून कंपन्यावर दडपण येते. या नैसर्गिक साधनाचे काही बड्या कंपन्याच्या हाती केंद्रीकरण होत आहे. उलट लहान शेतकरी स्त्रिया, दलित, आदिवासी या उत्पादन साधनांचा वंचित होत आहेत. नवीन विकासामधून पाणी व वीज याची मागणी वाढेल. ती पुरवण्यासाठी नवी धरणे व वीज केंद्र उभी राहतील आणि शेतकरी व आदिवासी आपल्या जमिनी व जंगले यापासून विस्थापित होतील. जागतिक बाजारपेठेमधील मागणी पूरी करण्यासाठी पिके काढल्यामुळे अन्नधान्य व आवश्यक वस्तूंची कमतरता निर्माण होईल. यांत्रिक पध्दतीने शेती सुरू झाल्यावर पूर्वीपासून शेतीवर अवलंबून राहणाऱ्या लोकांना बेकारीला तोंड द्यावे लागेल. स्थानिक बाजारपेठ ऐवजी जागतिक बाजारपेठेवर अवलंबून राहिल्यावर शेतीतील अस्थिरता वाढीस लागेल. त्यामुळे लहान शेतकऱ्यावर संकट कोसळते नवी बियाणे व नवी तंत्रे यांच्यामुळे पूर्वीपासून पोट भरण्यासाठी वापरलेल्या पध्दती जागतिक मंदीमुळे निरूपयोगी होतील. उदारीकरणामुळे बड्या भांडवलदारांना परकीय कंपन्यांची हातमिळवणी करून नफा मिळवता येईल. आणि काही उच्च शिक्षितांना मोठया पगाराच्या नोकऱ्या मिळतील. गरीबांची परिस्थिती अधिकच हालखिची होईल.

विकसनशील भारतात कृषी, उद्योग व व्यवसाय ही तिनही क्षेत्र प्रगतीपथावर आहेत. त्यातील महत्वपूर्ण क्षेत्र म्हणजे उद्योग होय. औद्योगिकीकरण हे विकासाचे प्रमुख द्योतक मानले जाते. परंतु भारताच्या औद्योगिकीकरणामध्ये अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य मोठ्या प्रमाणात जाणवते. अमेरिकेतील मंदीमुळे बहुराष्ट्रीय कंपन्याच्या आर्थिक प्राबल्यासोबतच भारतीय संस्कृतीवर देखील त्याचा विपरीत परिणाम होतो. भडक जाहिराती करून मानसिक विकृती करणे. विशिष्ट बाजारपेठ प्रस्थापित करणे (सुपर मार्केट मॉल्स) भारतासारख्या विकसनशील देशातील सामान्य ग्राहकांना हे परवडणारे नाहीत. अशा कंपन्याचा नैतिकतेशी देखील संबंध नसतो. अशा कंपन्यामुळे विकासाला काही प्रमाणात हातभार लागत असला तरी सामान्य व्यक्तीच्या हाताला काम मिळत नाही त्याच्या हातावरील आर्थिक भार वाढतो आहे.

भारतात आज युनिलिव्हर, सोनी, तोशिबा, टोयाटो मोटर्स, नेसले इत्यादी प्रमुख अमेरिकेतील बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्राबल्य जाणवते. या कंपन्यांद्वारे होणारे औद्योगिकीकरण वर-वर लोभस वाटत असले तरी त्याचे परिणाम भारतीय अर्थव्यवस्थेवर विपरीत होत आहेत. अशा संस्था जनतेचे हित लक्षात घेत नाहीत. आज ग्रामीण, लघु व कुटीर

उद्योग जवळजवळ नामशेष होऊन जनतेच्या हाताचे काम हिरावून घेतले गेले आहे. बहुराष्ट्रीय कंपन्यांमधील वाढत्या यांत्रिकीकरणामुळे भारताच्या बेरोजगारीत वाढ होत आहे.

१९९० च्या अखेरीस भारतात बहुराष्ट्रीय कंपन्यांची संख्या ८३३ एवढी होती. २००३ मध्ये त्यात ९० कंपन्यांची भर पडली. त्यामध्ये कृषी अवजारे क्षेत्रात मॅसी फर्ग्युसन, चहा उद्योगात ब्रुक-ब्रॉन्ड, हिंदुस्थान लिव्हर, कोलगेट, पाम ऑलिव्ह, जॉन्सन ॲण्ड जॉन्सन, पॉण्डस, कीटकनाशकामध्ये बायर आय. सी. ए. दुग्धजन्यमध्ये ग्लॅसनी, हॉरलिक्स, नेसले, विजेमध्ये फिलीप्स, औषध क्षेत्रात सिबा, बुटस इत्यादीचा उल्लेख करता येईल. अशा कंपन्यांचा भारतीय कंपन्यावर प्रभाव पडतो. कारण एकूण गुंतवणूकीपैकी फार मोठी गुंतवणूक अशा कंपन्यांनी भारतातच उभारली आहे. एकूण भांडवलीपैकी ९५ % भांडवल भारतीय अर्थव्यवस्थेतूनच उभे केले असून भारतीय उद्योगांमध्ये मोठया प्रमाणावर करार केले आहेत. त्यामध्ये तंत्रज्ञान हस्तांतरण, वस्तुचा ब्रॅन्ड याचा समावेश आहे. एकुण गुंतवणूकीपैकी ५७ % एवढी गुंतवणूक रस्ते, विजनिर्मिती तेल शुध्दीकरण, दूरसंचार, सिमेंट, खते यासारख्या क्षेत्रात करण्यात आली त्यामध्ये परकीय गुंतवणूकीचा वाटा १४ % होता.

जागतिक बँकेचे अधिकारी अँडरसन यांनी भारत सरकारला एक पत्र पाठवून जागतिक बँक कर्जदारावर लादत असलेलया अटीची जाणीव करून दिली. जागतिक बाजारपेठेत भारताला स्वस्त दराने नेहमीच्या वापराच्या वस्तु पुरविता याव्या. या दृष्टीने भारतीय उद्योगाची पुनरर्चना करण्यासाठी शासनाने उद्योग, कापड, श्रम, पैसा आणि वित्तीय सेवा याबाबत आखलेल्या निरनिराळया धोरणाची योग्य प्रकारे परस्पर संबंध प्रस्थापित करावे. असे सुचविले होते. भारताला कर्ज देणारी जी युरोपीय राष्ट्रे होती ती आपली धोरणे जागतिक बँकेच्या सुचनेवरून ठरवितात. १९८९ मध्ये त्यांनी भारताला कर्ज देणे बंद केले आणि कर्जाच्या बदलत्यात भारताने आपली धोरणे बदलावीत अशी मागणी केली जागतिक बँक कर्ज देत नाही. असे दिसून आल्यावर कर्जदाराची विश्वासर्हता ठरविणाऱ्या आंतरराष्ट्रीय संस्थांनी Rating Agencies भारताची विश्वासर्हता कमी झाल्याचे जाहीर केले. त्यामुळे अनिवासी भारतीय घबराट उडाली आणि त्यांनी आपल्या ठेवी भारतीय बँकामधून काढून परकीय बँकामध्ये ठेवण्यास सुरूवात केली. १९९१ च्या मधल्या काळात ९५.२ कोटी डॉलर्सच्या ठेवी काढून घेण्यात आल्या. अखेर कर्जासाठी जागतिक बँकेला शरण जाऊन तिच्या सर्व अटी भारताला मान्य कराव्या लागल्या आहेत.

जागतिक मंदीचा सर्वात मोठा परिणाम भांडवल गुंतवणूकीवर आलेला दिसून येतो. परकीय राष्ट्रातील कंपन्यानी भारतामध्ये स्थानिक बँका आणि वित्तीय संस्था यांच्याकडून व्याजाने पैसे घेऊन येथील कंपन्या खरेदी केल्या. लाफार्जने ५५० कोटी रूपयात टाटा इंडस्ट्रीजची स्टील कंपनी Tisco विकत घेतली तेव्हा २१५ कोटी रूपये आय. सी. सी. कडून इतर स्टेट बँक व एच. एफ. डी. कडून कर्ज घेतले होते. याचा अर्थ असा की बहुराष्ट्रीय कंपन्यांची जे मोठे सौदे करून येथील कंपन्या विकत घेतल्या तेव्हा त्यामध्ये परदेशामधून आलेले भांडवल त्यामानाने अल्प स्वरूपाचे होत. जागतिकीकरणामधून आपण विकासाचे जे प्रारूप स्वीकारले आहे. त्यामधून पर्यावरणाचा नाश होणे अटळ आहे. शासनाने सामाजिक जमीन ताब्यात घेतली की तिचा परिणाम निसर्गातील विविधता नष्ट करण्यात होतो. भारतातील अरण्याचे आता उद्योजकासाठी मळे किंवा मध्यवर्गासाठी सहलीची स्थाने यांत रूपांतर होत आहे. जागतिक बँकेकडून वनविकास व पर्यावरण विकास म्हणून ज्या योजना अमलात आणल्या जात आहेत. त्यांचा हा परिणाम होय. जागतिक व्यापार संघटनेने करून घेतलेल्या जी. ए. टी. टी. करारामुळे आदिवासीचे जमिनीवरील हक्क व त्याचे परंपरागत ज्ञान वनस्पती तंत्रावर अधिकार सांगणाऱ्या बड्या कंपन्याची खाजगी मालमत्ता बनत आहे. जागतिक मंदीतून भारत सरकारने शेतीच्या आयात मालावरील कर फार मोठया प्रमाणात कमी केला. त्यामुळे परदेशातून मोठया प्रमाणावर शेतीमालाची

आयात सुरू झाली. ऑस्ट्रेलियातील सफरचंद न्यूझीलंडची केळी, सिंगापूरहून एवढया मोठया प्रमाणात कांदा आयात झाला की नाफडेला शेतकऱ्याकडून कांदा खरेदी करता आला नाही. अन्नधान्याची परदेशातून एवढी मोठी आयात झाली की भारतातील शेतकऱ्यांनी पिकविलेल्या धान्याला उठाव आला नाही. त्यामुळे या वस्तूचे उत्पादक शेतकरी कफल्लक झाले आणि ग्रामीण भागात हाहाकार माजला. पुन्हा शेतावर कर ३० % लावल्याचे केंद्र सरकारने घोषित केले आहे.

जागतिक मंदीमुळे रूपयाचे अवमूल्यन झाल्याने आयात मालाची किंमत वाढून भारतातील इतर वस्तूच्या किंमतीही वाढ झाली. मात्र त्या प्रमाणात मजूरीत वाढ झाली नाही. त्यामुळे प्रत्यक्ष मिळणाऱ्या जीवनपयोगी वस्तू कमी झाल्या आहेत. महाराष्ट्र राज्याने कमाल जमीन धारणा कायदा रद्द करावा असे नाणे निधीकडून त्याच्यावर दडपण येत आहे तसे झाल्यास शेती उद्योग कंपन्या Agro Business Corporations फार मोठया प्रमाणात जमिनी खरेदी करून, नांगरणी व कापणीसाठी यंत्राचा वापर करतील बहुसंख्य लोक शेतमजूर म्हणून काम करीत असल्याने यांत्रिकीकरणाने त्याच्या रोजगारीत फार मोठी घट झाल्याशिवाय राहणार नाही.

परकीय गुंतवणूक कंपन्या आणि युरो-बिझीनेस यामधून येथील शेअर्स व रोखे यामधील गुंतवणूकीत Port Folio Investment जी वाढ झाली त्याचे भारतातील शेअर बाजार परिणाम झाले आहेत. भारतातील गुंतवणूकदार कंपन्यांची ताकद त्याच्या मानाने खूप कमी आहे. त्यामुळे बाजारातील उलाढाला येथील कंपन्यांपेक्षा परकीय कंपन्यांच्या खरेदी विक्रीवर अवलंबून आहे. त्यांच्या कृतीवरून बाजारातील भावाचे चढउतार ठरतात. शेअरबाजारातील भावाचे चढउतरही आता वाढले आहेत. भारतीय कंपन्या जागतिक ठेवीच्या पावत्या Global Depository Receipts काढतात तेव्हा त्यांचे बाजारातील भाव ठरविल्यातही या परकीय कंपन्यांचा मोठा सहभाग असतो. जागतिक व्यापार संघटनेने वित्तीय सुविधांबाबत केलेले ठराव मान्य करून परकीय बँकांना भारतात नवी शाखा काढण्यास परवानगी दिली आहे.

आज `खाऊजा`, धोरणाने भारतातील सरकारी सार्वजनिक क्षेत्राचे खाजगीकरण करून ९० % लोकांचा हक्क असलेली संपत्ती १० % लोकांच्या हातात देण्याचे काम सुरू केले आहे. एका सर्व्हेनुसार भारतातील दारिद्र्याचे प्रमाण ४० % वरून ४२ % झाले आहे. जागतिककरणामुळे वाहतुक क्षेत्र, दुरसंचार, दुरदर्शन, संगणक क्षेत्रात मोठया प्रमाणात विकास झाला परंतु ह्या सर्व गोष्टींमुळे भारतातील लोकांच्या अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण आरोग्य या मुलभूत गरजा पूर्ण झाल्यात का ? आजही गरीब श्रीमंत दरी रूंदावत आहे.

भारतामध्ये ज्या इन्फर्मेशन टेक्नॉलॉजी (आय. टी.) क्षेत्राची बुम होती. ह्या क्षेत्रात सर्वाधिक पगार होता. मॉल्सपासून मल्टिप्लेक्सपर्यंत ज्यांची गर्दी होती त्याच क्षेत्रातल्या १०,००० जणांना नोकरीवर पाणी सोडावं लागलं आहे. एव्हिएशन क्षेत्रात कितीतरी पायलटस्, एअरहोस्टेस आणि ग्राऊंडमधल्या अनेकांना नोकरी गमवावी लागली आहे.

रिटेल सेक्टरला, किरकोळ विक्री केंद्राच्या क्षेत्राला मंदीचा मोठा फटका बसला आहे. सुभिखा ही स्वस्त वस्तु देणारी दुकानांची चेन मंदीमुळे बंद झाली आहे. आर्थिक मंदीचा मोठा फटका बांधकाम उद्योगाला बसला आहे. ह्या कंपन्यांची काम ७० % नी कमी झाली आहेत. ४० हजार रूपये फुट दराने जमीन घेऊन तयार केलेले बांधकाम २५ हजार रूपये फुट दराने विकले जात नाही. अर्धवट अवस्थेत थांबलेले बांधकाम प्रकल्प भारतात कित्येक ठिकाणी आढळत आहे. बांधकाम व्यवसायातील मंदीचा थेट परिणाम सिमेंट, स्टील, पाईप आणि वास्तुरचनाशास्त्र ह्या क्षेत्रात झाला आहे. रंगारी, गवंडी, सुतार, प्लंबर अशा मजूर वर्गाला मंदीचे चटके जाणवत आहे.

आर्थिक मंदीला तोंड देतांना नोकर कपात करण्याबरोबरच बहुतेक मोठया कंपन्यांनी कॉस्ट कटिंगवर अथवा कॉस्ट कंट्रोलवर भर दिला आहे. इंधन आणि ऊर्जेची जास्तीत जास्त बचत करून किरकोळ खर्चावर नियंत्रण आणले जात आहे. प्रत्येक कामगार कपाती मांग मंदीचं कारण खरंच आहे का ? या मंदीतही घोटाळे आहेत. सरकारने आतापर्यंत ५०,००० कोटी मंदीवर उपाययोजना करण्यासाठी वेगवेगळया उद्योगांना पॅकेज म्हणून दिले. ज्यांना मंदीची झळ लागलेली नाही अशांना हे पॅकेज मिळाले. अनेक उद्योगांवर आर्थिक मंदीत टाळ लावण्याची वेळ आली असली तरी त्यांच्या दुर्देशेला आधीपासूनच सुरूवात झाली होती. आणि त्यांची कारणे मंदीपेक्षा वेगळी आहेत. मंदीचा फायदा घेत कामगार कपात केली जात आहे.

**संदर्भ ग्रंथ :**

१) भारतीय अर्थव्यवस्था - एस. के. मिश्रा एवं व्ही. के. पुरी
हिमालया पब्लिकेशन हाऊस

२) Indian Economy - Dr. D. C. Agrawal
Sahitya Bhawan Publication

३) Globlisation and Indian Economy -Prof. Dr. D. G. Girdhari,
Dr. D. A. Nikam

४) जागतिक अर्थव्यवस्था - डांगे आणि काकडे, फडके प्रकाशन

RESEARCH JOURNEY